240

दै. लोकमत ३० डिसेंबर २००५

# कमला महाविद्यालयात किसान दिनानिमित्त परिसंवाद

कोल्हापूर, दि. २९ : येथील कमला कॉलेजमध्ये लोकसंख्या शिक्षण मंडळ कार्यशाळा विभागामार्फत किसान दिनाच्या निमित्ताने परिसंवादाचे आयोजन केले होते. परिसंवादामध्ये बी. ए. भाग १, २ व ३ या वर्गातील अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींनी 'भारतीय शेती, शेतकऱ्यांच्या आत्महत्या' या विषयावर आपले शोधनिबंध सादर केले. प्रमुख पाहुणे प्रा. अनिल घस्ते यांनी 'सांजवेळ' ही कविता सादर करून ग्रामीण समाजाचे दुःख स्पष्ट केले आणि आर्थिक सुधारणेची आवश्यकता व्यक्त केली. सौ. अनघा पाठक यांनी शेतीतंत्रविद्याविषयक कायद्याचा आढावा घेतला तर प्रा. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी शेती बाजारपेठांचे शेती विकासातील योगदान स्पष्ट केले. नेताजी पोवार यांनी शेतीमधील गुणात्मक वाढ आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठा याविषयीचा आढावा घेतला. या परिसंवादास प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.